क्र.पोउपा/वाहतुक/प्रशा-१/अधिसुचना/ ५१ /२०१६
पोलीस उपायुक्त,वाहतुक विभाग यांचे कार्यालय,
ठाणे शहर. दि. ३१ /०८/२०१६

**ठाणे शहर**

## -: वाहतुक नियंत्रण अधिसुचना :-

ज्याअर्थी, भिवंडी - निजामपुरा शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात रिक्षा चालक रिक्षा स्टॅण्डच्या ठिकाणी रिक्षा न थांबविता स्वतःच्या सोईच्या भाडयासाठी रिक्षा स्टॅण्डच्या मागे - पुढे रस्त्यात थांबवुन वाहतुकीस अडथळा निर्माण करित आहेत ; आणि,

ज्याअर्थी, अनधिकृत असलेल्या व वाहतुकीस अडथळा करणा-या रिक्षा थांब्यांच्या ठिकाणी रिक्षा थांबवुन रिक्षाचालक प्रवाशांची चढ-उतार करुन सार्वजनिक वाहतुकीस बाधा निर्माण करत असल्याचे आढळुन आले आहे ; आणि,

ज्याअर्थी, सिग्नल तसेच मुख्य रस्त्यावर / चौकात रिक्षा उभ्या करुन प्रवाशांची चढ-उतार करुन रिक्षा चालकांकडुन वारंवार सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण केला जात आहे आहे ; आणि,

ज्याअर्थी, रिक्षाचालक रस्त्यावर कोठेही गटागटाने रिक्षा थांबवुन मुख्य रस्त्यावरील डाव्या मार्गिका बंद करुन वाहतुक कोंडी करणेस कारणीभुत होत असल्याने रिक्षा थांब्याचे नियमन करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे ;

त्याअर्थी, मी, संदीप भानुदासराव पालवे, मला ठाणे शहर वाहतुक विभागाचा पोलीस उपायुक्त म्हणुन महाराष्ट्र शासन, गृहविभाग क्र.एम.व्ही.ए.११६/सीआर/३७/टीआर दि.२७-०९-१९९६ चे अधिसुचनेनुसार व मोटार वाहन कायद्याचे कलम ११५, ११६(१)(अ)(ब) व ११७ अन्वये प्राप्त अधिकारानुसार व त्याअनुषंगिक कर्तव्यार्थ खालीलप्रमाणे अधिसुचना निर्गमित करित आहे :-

रिक्षा थांब्याचे 'लघु स्टॅण्ड ( १ ते ५ रिक्षा)' , 'मध्यम स्टॅण्ड (६ ते १५ रिक्षा)' व 'मोठे स्टॅण्ड ( १६ ते २५ रिक्षा )' याप्रमाणे वर्गीकरण करणेत येवून, या वर्गीकरणा प्रमाणे चौक व चौकाचा परिघ वगळुन, दोन स्टॅण्डमधील किमान अंतर अर्धा व कमाल अंतर दोन कि.मी. ठेवुन , कायम अतिगर्दीचा रस्ता वगळुन, कोणत्याही वास्तु अगर आवाराचे प्रवेश व निकासास अडथळा निर्माण होणार नाही अशापध्दतीने मध्येच रिक्षा स्टॅण्ड राहणार नाही इत्यादी बाबी दृष्टीक्षेपात ठेवुन भिवंडी-निजामपुरा शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील उपलब्ध जागेनुसार खालील ठिकाणी रिक्षांकरिता थांबे निर्धारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | युनिट | रिक्षा थांब्याचे ठिकाण | रिक्षा थांब्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | भिवंडी ट्रॅफिक युनिट | अंजुर जकात नाका कशेळी रोडकडे जाणारे रोडवर | लघु |
| २ | | मानकोली नाका अंजुर चौकाकडे येणारे रोडवर | मध्यम |
| ३ | | अंजुर जकात नाका कडुन भिवंडीकडे जाणारे रोडवर | मध्यम |
| ४ | | काल्हेर गेट कडुन कापुरबावडीकडे जाणारे रोडवर | मध्यम |
| ५ | | आग्रा रोड ,गुरूकृपा हॉटेलच्या समोर (अंजूरफाटा दिशेकडे ) | लघु |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | | आग्रा रोड हत्ती सायजिंग | लघु |
| ७ | | रतन सिनेमासमोर,सिध्दीविनायक स्वीट मार्ट जवळ (विठ्ठलनगरच्या दिशेने ) | लघु |
| ८ | | देवजी नाक्याजवळ म्युनिसिपल चौकी( आग्रा रोडच्या दिशेने ) | लघु |
| ९ | | अंजूर फाटया जवळ नारपोली रोड सुशांत हॉटेल | लघु |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | | धामणकर नाका ,बीएनएन कॉलेजकडे जाणाऱ्या रोडवर | मध्यम |
| ११ | | धामणकर नाका टेलिफोन एक्सचेंजकडे जाणाऱ्या रोडवर | लघु |
| १२ | | गोपाळनगर –ओमणी टॅक्सी स्टॅन्ड प्रस्ताविक आहे ( आरटीओ कडून अंतिम आदेशावर ) | लघु |
| १३ | | कल्याण रोड (कल्याण नाका) गोपाळनगर जवळ | मध्यम |
| १४ | | अशोक नगर रोड ,सी–८ बिल्डींगजवळ | मध्यम |
| १५ | | कल्याण रोड आसबीबीनाका पीओ नं. एफटीआर जवळ | मध्यम |
| १६ | | कल्याण रोड नवीवस्ती पीओ नं. १/१५ | लघु |
| १७ | नारपोली टॅफिक युनिट | कल्याण रोड पाईपलाईन भादवड पोलीस लाईन रस्त्याकडे सुप्रिया जनरल स्टोअर्स समोर | मध्यम |
| १८ | | कल्याण रोड जवळ अप्सरा सिनेमा पीओ नं.७१/४ | लघु |
| १९ | | गोपाळनगर गेट नं. १ मुंबई आग्रा रोड जवळ बिल्डींग नं. ३ | लघु |
| २० | | शांतीनगर रोड जकात नाका गायकवाड विश्रांती गृहा जवळ | मध्यम |
| २१ | | जुना एस.टी.स्टॅन्ड हिमाचल बिल्डींग समोर | मोठा |
| २२ | | डॉ. आंबेडकर रस्ता असिना फरान सिनेमा समोर | मध्यम |
| २३ | | नागांव रोड समोर एस.टी.स्टॅन्ड शिवसेना कार्यालया जवळ | मध्यम |
| २४ | | कल्याण श्शहराकडे जाणाऱ्या रिक्षा साठी एसटी स्टॅन्डच्या बाहेर जाणाऱ्या गाडयांचे गेटचे डावे बाजूस | मोठा |
| २५ | | भिवंडी श्शहराकडे जाणाऱ्या रिक्षासाठी एसटी स्टॅन्डच्या बाहेर जाणाऱ्या गाडयांच्या गेटचे उजवे बाजुस | मोठा |
| २६ | | एसटी स्टॅन्डच्या गेटचे डावे बाजूस | मोठा |
| २७ | | अशोक नगर गबेट नं. १ दांडेकर वाडी पोस्ट तार ऑफिस जवळ | लघु |

| अ. क्र. | युनिट | रिक्षा थांब्याचे ठिकाण | रिक्षा थांब्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| २८ | | कोनगाव चौक | मध्यम |
| २९ | कोनगांव ट्रॅफिक युनिट | गोवेनाका | लघु |
| ३० | | भादवड नाका | मध्यम |
| ३१ | | रांजनोली नाका | मोठा |
| ३२ | | रांजनोली नाका | मोठा |
| ३३ | | रांजनोली नाका | मध्यम |

सदरची अधिसुचना दिनांक ०१-०९-२०१६ पासुन तीन महिन्यांसाठी प्रायोगिक तत्वावर लागु करण्यात येत आहे. या संदर्भातील यापुर्वीच्या सर्व अधिसुचना या अधिसुचनेव्दारे अधिक्रमित करण्यात येत आहेत. या कालावधित काही सुचना / आक्षेप असल्यास ते लेखी स्वरुपात पोलीस उपायुक्त, वाहतुक नियंत्रण विभाग, तीन हात नाका, एल.बी.एस.रोड, ठाणे (पश्चिम) येथे कळवावेत. सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्यापासुन तिमाहित काही सुचना वा आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढे सदरची अधिसुचना कायमस्वरुपी अंमलात राहील.

(संदीप भा.पालवे)
पोलीस उपायुक्त,वाहतुक विभाग
ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा प्रसिध्दि अधिकारी, ठाणे

२/- या अधिसुचनेची प्रसिध्दि करणेस आपणास विनंती करणेत येत आहे.

प्रत मा.सविनय सादर :-
१.मा.पोलीस आयुक्त साो, ठाणे शहर
२.मा.पोलीस सह आयुक्त साो, ठाणे शहर.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी सविनय सादर
मा.आयुक्त, भिवंडी - निजामपुरा शहर महानगरपालिका, भिवंडी.

२/- आपणास विनंती करण्यात येते की, आपण मोटार वाहन कायद्याचे कलम ११६(१)(अ)(ब) अन्वये संबंधित ठिकाणी लघु, मध्यम व मोठे याप्रमाणे सुयोग्य रिक्षा स्टॅण्डचे फलक लावणेबाबत तसेच सदर रिक्षा स्टॅण्ड करिता सुयोग्य लोखंडी रेलींग बसविणेबाबत आपले अधिनस्थ संबंधितांना आदेश निर्गमित करावेत.

प्रत कार्यवाहीस्तव
१. वाहतुक सपोआ.वाहतुक उपविभाग, भिवंडी
२.प्रभारी अधिकारी, भिवंडी, नारपोली, कोनगांव ट्रॅफिक युनिट.

प्रत :- पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे विभाग, ठाणे.
२/- कृपया सदरची अधिसुचना ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेस विनंती आहे.

प्रत :- समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे शहर.
२/- त्यांनी याबाबतची प्रसिध्दि ई पोलीस पत्रकात द्यावी.